# श्री. इस्तारी गोविंदराव केवट

सेवक क्र. १९११ मु. शिवाजी वार्ड, शुक्रवारी, भंडारा

माझी पत्नी सौ. राधा ही अतिशय दुःखाने पीडित होती. ह्याकरिता मी डॉक्टरांचे आणि वैद्यांचे औषध तिला दिले. पण काही फायदा झाला नाही. शेवटी देव देवतांचे व मंत्रोपचार यांचे प्रयत्न केले तरीही आराम झाला नाही. दुःखामुळे मी अतिशय कर्जबाजारी झालो. त्यामुळे माझी मन स्थितीही ठिकाणावर नव्हती.

एकदा बाबांचे एक सेवक श्री. अनवीर उके हे धानला येथून भंडाऱ्याला अचानक आले. ते माझे मावस भञाऊ आहेत. त्यांनी एका भगवंताची रुपरेषा व मार्गदर्शन सांगितले. त्यांचे मार्गदर्शन मला एकदम आवडले. मी कुटुंबाशी विचार करुन मार्ग स्वीकारण्याचे ठरविले. मी धानला ह्या गावी जाऊन श्री. अनवीर उके यांची भेट घेतली व मार्गावर येण्याची माझी इच्छा असल्याचे सांगितले. त्यांनी मला श्री. राघोजी मदनकर या प्रमुख सेवकाकडे नेले. त्यांनी मला सात दिवसांचे साधे कार्य दिले. त्यामुळे माझ्या पत्नीला आराम मिळाला. नंतर त्यांनी अकरा दिवसांचे साधे कार्य दिले. त्यामुळे संपुर्ण सुखसमाधान मिळाले. नंतर बेचाळीस दिवसांचे त्यागाचे कार्य दिले. सदतीस दिवस पूर्ण झालेत आणि दि. ४-११-१९८४ रोजी माझ्या पत्नीला रात्री आठ वाजता एकाएकी पोटाचा त्रास होऊ लागला. मार्गावर येण्याआधीच पाच महिन्यांचा गर्भ होता. पोटाच्या त्रासाबद्दल तिने मला सांगितले. ती उठून बाहेर गेली व लगेचच घरी परत आली. ती अतिशय घाबरल्यासारखी झाली होती. ती मला म्हणाली, तुम्ही कोणत्या तरी बाईला ताबडतोब बोलावून आणा. मी सौ. बेबीताई गायधने हिला बोलावून आणले. ती म्हणाली, तुम्ही दाईला (सुईणीला) ताबडतोब बोलवा. मी दाईला बोलवायचे टाळले व बाबांचे तीर्थ करुन दिले. आराम झाला नाही. शेवटी मी दाईला बोलावून आणले. दाईने तपासल्यावर पोटातील गर्भ निर्जीव पडलेला आहे असे तिच्या लक्षात आले. तिने ताबडतोब दवाखान्यात न्यायाला सांगितले. तसाच मी रिक्षा आणण्याकरिता गेलो. मला या पंथाचे एक सेवक श्री. जीभकाटे बाबू यांची आठवण झाली. त्यांच्या सल्ल्यानुसार काय करावयाचे ते ठरवावे म्हणून त्यांच्याकडे गेलो. ते झोपले आहेत असे त्यांच्या पत्नीने सांगितले. त्यांच्या पत्नीला सर्व हकीगत सांगितल्यावर ती म्हणाली. त्यागाचे कार्य चालू असताना दवाखान्यात नेता येत नाही. मी म्हणालो, तुम्ही श्री. जीभकाटे बाबूंना

उठवा. ती म्हणाली. मी त्यांना झोपेतून उठवू शकत नाही. मी निराश होऊन घरी आलो आणि परमेश्वराला विनंती केली की हे भगवान तुम्ही या क्षणी आमचे रक्षण करा.

शेवटी नाईलाजास्तव पत्नीला दवाखान्यात न्यावे लागले. परंतु ध्येय पूर्ण एकाच भगवंताकडे होते. डॉक्टरांनी पत्नीला तपासल्यावर सांगितले की हिच्या पोटातील मूल मेलेल आहे. त्यामुळे हिचे ऑपरेशन करावे लागेल. त्यावेळी पत्नी बाबांचे मुक ध्यान करु लागली. भगवान बाबा हनुमानजी मी तुमच्याच नावावर जगीन किंवा मरीन. तिला तीव्र वेदना होत होत्या. त्यामुळे ती डोळे भरुन पाहत होती. त्यावेळी मी पत्नीचे शेवटचे क्षण आहेत असे समजत होतो. परंतु पुढे काय घडणार याची जाणीव मानवाला नसून भगवंताला असते. प्रत्यक्ष बाबा हनुमानजीचे माझ्या पत्नीला सामान्य रुग्णालय, भंडारा येथे दिलेली जागृती आणि परमेश्वराचे सत्यबोल खाली देत आहे.

बाबा – मुझे पहचाना नही ?

पत्नी – नही।

बाबा – तू किसकी प्रार्थना करती है ?

पत्नी – बाबा हनुमानजी की।

बाबा – मै हूँ बाबा हनुमानजी। बेटा, तू रोना नही । तू मर नही सकती । तूम्हे जो कुछ हुआ मेरे हाथ से हुआ । तुम्हारी कुछ भी गलती नहीं। यह जो सन्तान आनेवाली थी वह अच्छी नही थी । वह होने के बाद माँ या बाप मरनेवाला था इसलिये मैंने ऐसा किया। जब तु आठ बजे रातको प्रार्थना करने बैठी थी । तभी मैं तेरे पीठ के उपर बैठा था और तीर्थ के उपर फूंक मारा वैसेही गर्भपात होना सुरु हुआ। अच्छा बेटा, अब मैं चला। मेरा तुम्हे आशिर्वाद है। देखो वह आ रहे है।

एवढे बोलून बाबा हनुमानजी अदृश्य झाले आणि भगवंताने दिलेल्या आशिर्वादाने माझ्या पत्नीचे बिना ऑपरेशनने सुखरुप अबॉशर्न झाले. एका भगवंताच्या नावाने मेल्यानंतर कसे जीवनदान मिळते हे प्रत्यक्ष अनुभवास आले आहे.

कलियुगात सुध्दा श्रध्देनुसार कसे फख मिळते हे आम्हाला एकच भगवान बाबा हनुमानजी यांच्या उपासनेने अनुभवाला आले.

* * * * *